**“नोव्हेंबर २०१६” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या <u>महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...</u>**

## (अ) <u>शासन निर्णय / अधिसूचना</u>

- दिनांक ८ नोव्हेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेच्या ८ अस्थायी पदांना दिनांक २८ फेब्रुवारी २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

- दिनांक ७ नोव्हेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत मंजूर तरतुदीतून राज्य प्रशिक्षण “प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (रामेती), खोपोली, रायगड” या विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेस प्रशिक्षण हॉलसाठी फर्निचर व प्रशिक्षण साहित्य व खरेदी करण्यासाठी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर योजनांतर्गत उपलब्ध असलेल्या अनुदानापैकी रु.९,७८,४००/- एवढे योजनांतर्गत सहायक अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

- दिनांक ४ नोव्हेंबर २०१६ च्या पत्रान्वये “Child Education allowance (CEA) Clarification” या विषयाबाबतचे केंद्र शासनाच्या कार्मिक व लोक तक्रार व निवृत्तीवेतन मंत्रालयाचे पत्र व ऑफिस मेमोरेन्डम महाराष्ट्र संवर्गातील सर्व भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यात आले आहे.

- दिनांक १७ नोव्हेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीसाठी दिवंगत शासकीय कर्मचाऱ्यांच्या पात्र नातेवाईकांच्या यादीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

- दिनांक १७ नोव्हेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. परीक्षेचे सुनियोजित आयोजन व प्रभावी नियंत्रणासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने विहित केलेल्या १९ सूचनांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना सर्व जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांना देण्यात आल्या आहेत.

- दिनांक १९ नोव्हेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) अधिकारी तसेच गट-ब (अराजपत्रित), गट-क, गट-ड संवर्गातील कर्मचारी यांची सरळसेवा, पदोन्नती व प्रतिनियुक्ती या माध्यमाव्दारे नियुक्ती करण्यासंदर्भात नियुक्ती प्राधिकारी निश्चित करण्यात आले आहेत.

- धारणाधिकारासंदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मध्ये नियम-२२ ते २६ अंतर्गत तरतुदी अस्तित्वात असल्याने, राजकिय व सेवा विभागाचे क्रमांक-३८६८/४६, दिनांक २५ मे १९५५ चे शासन परिपत्रक, दिनांक १९ नोव्हेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये रद्द करण्यात आले आहे.

- दिनांक २२ नोव्हेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये आस्थापना मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात येणारे राज्य शासनाच्या सेवेतील रु.७६००/- आणि अधिक ग्रेड वेतन असलेल्या पदोन्नतीचे प्रस्ताव विहित केलेल्या तपासणीसूचीनुसार तपासून परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

- केंद्र शासन, वित्त मंत्रालय (खर्च विभाग) यांच्या क्रमांक-१/२/२०१६-ई--II(बी), दिनांक ४ नोव्हेंबर २०१६ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना दिनांक १ जुलै २०१६ पासून २% दराने महागाई भत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे.

- केंद्र शासनाच्या कार्मिक, लोक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालय, निवृत्तीवेतन व निवृत्तीवेतनधारकाचे कल्याण विभाग, नवी दिल्ली यांच्या क्रमांक-४२/१५/२०१६-पी ॲण्ड डब्ल्यू (जी), दिनांक १६ नोव्हेंबर २०१६ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतन धारकांना दिनांक १ जुलै २०१६ पासून २% दराने महागाई भत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे.

- वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर या संस्थेला एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी उपलब्ध निधीतून २०७००८६२ या लेखाशीर्षाखालील ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) आणि ३१-सहायक

अनुदान (वेतन) या उद्दिष्टांतर्गत एकूण रु३७.०८ लाख इतके अनुदान दिनांक २९ नोव्हेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये वितरित करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

**(ब) प्रशिक्षण**

- "मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय यामधील सहायक कक्ष अधिकाऱ्यांची कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी आणि सरळसेवेने नियुक्त झालेल्या कक्ष अधिकाऱ्यांसाठी सन २०१६ मधील विभागीय परीक्षा दिनांक २२ ते २४ नोव्हेंबर २०१६ या कालावधीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा परीक्षा कक्ष, विक्रीकर भवन, माझगांव येथे आयोजित करण्यात आली आहे.

**(क) पदोन्नती / निवडसूची / ज्येष्ठतासूची**

- मंत्रालय आहार / उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील आचारी / चहातज्ञ, कुपन विक्रेता, सहायक आचारी / चहा बनविणार, पर्यवेक्षक, सफाईगार, वेटर, वाढपी, बॉयवेटर, शिपाई व हमाल या गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१० ते १ जानेवारी २०१६ पर्यंतची स्थिती दर्शविणारी अंतिम सामाईक ज्येष्ठतासूची दिनांक १० नोव्हेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- २ अवर सचिवांना उपसचिव पदी व १ कक्ष अधिकाऱ्याला अवर सचिव पदी पदोन्नती देण्यात आली आहे.

- दिनांक ३० नोव्हेंबर २०१६ च्या कार्यालयीन आदेशान्वये सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील गट-क व गट-ड संवर्गातील ३८ कर्मचाऱ्यांपैकी गट-क संवर्गातील अनुक्रमे ७ कर्मचाऱ्यांना पहिला लाभ व २३ कर्मचाऱ्यांना दुसरा लाभ आणि गट-ड संवर्गातील ८ कर्मचाऱ्यांना दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे.

**(ड) बदल्या / पदस्थापना**

- भारतीय प्रशासन सेवेतील १४ अधिकाऱ्यांच्या दिनांक ३, ४ व ३० नोव्हेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये बदल्या / पदस्थापना करण्यात आल्या आहेत.

- अवर सचिव, कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी या संवर्गातील अनुक्रमे १, २, ३ अशा ६ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या / प्रत्यावर्तन करण्यात आल्या आहेत. अवर सचिव, कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील १, १, ३ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या स्थगित / रद्द करण्यात आल्या. सहसचिव, उपसचिव, अवर सचिव या संवर्गातील प्रत्येकी अशा ३ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात आल्या आहेत. उपसचिव व कक्ष अधिकारी संवर्गातील अनुक्रमे २, १ अशा ३ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीला मुदतवाढ देण्यात आली आहे.

***********